# २. उत्पादन आणि रोजगार



**Jean-Baptiste Say** (1767-1832)

## २.१- जे.बी.से. यांचा बाजार विषयक नियम

**जे.बी.से** यांनी त्यांचा नियम

TRAITED ECONOMIC POLITICS या पुस्तकात मांडला

१८०३ साली मांडला.

**“प्रत्येक पुरवठा स्वतःची मागणी निर्माण करतो”**

### से च्या बाजारनियमाची गृहीते

१. खुली बाजार पेठ आणि पुर्ण स्पर्धा
२. गुंतवणुकीसाठी नविन नविन क्षेत्रांची उपलब्धता
३. बाजाराचा विस्तार
४. बचत आणि गुंतवणूकीत समानता
५. स्वयंचलित अर्थव्यवस्था
६. दीर्घकाळ
७. अर्थव्यवस्था ही बंदिस्त स्वरूपाची असते.



## से च्या नियमाचे सूचितार्थ

☞ अर्थव्यवस्थेचा आपोआप समतोल.

☞ सामान्य अत्युत्पादन व सामान्य बेकारी अशक्य.

☞ पैसा विनिमय माध्यम म्हणून कार्य करतो.

☞ सरकारी हस्तक्षेपाचा अभाव

☞ बेकार सामग्रीचे उपयोग


☞ उत्पादनास मर्यादा नसते

# रोजगाराचा सनातनवादी सिध्दांत

सनातनवाद्यांच्या मते, पूर्ण रोजगार ही सामान्य स्थिती असते आणि पुर्ण रोजगारापासून दूर जाणे ही असामान्य स्थिती असते. जरी कोणत्याही वेळी प्रत्यक्ष पूर्ण रोजगार नसला तरी पूर्ण रोजगाराकडे जाण्याची नेहमीच प्रवृत्ती असते.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ : ॲडम स्मिथ,मार्शल, पिगू, रॉबर्टसन,फिशर, एजवर्थ इ.


**व्याजदराव्दारे बचत व गुंतवणूक समानता**



**से व रोजगाराच्या सिध्दांतावर केन्स व त्यांच्या अनुयायांच्या टिका:**

१. पुरवठा स्वत:साठी मागणी तयार करीत नाही.
२. अत्युत्पादनाची शक्यता.
३. वेतन कपातीचे धोरण अयोग्य
४. पैशाची तटस्थ भुमिका.
५. अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगार अस्तित्वात नसतो.
६. अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप आवश्यक असतो.
७. अर्थव्यवस्थेत बचत व गुंतवणूक समान नसते.
८. सिध्दांतासाठी दिर्घकाळाचा विचार योग्य नाही.
९. पैसा हा घटक निष्क्रय नसतो.

# २.२ केन्सचा रोजगार सिध्दांत



जॉन मेनर्ड केन्स (John Maynard Keynes-1883 to 1946)

लॉर्ड केन्स यांनी १९३६ मध्ये General Theory of Employment, Interest and Money या ग्रंथात रोजगारासंबधी आपले विचार मांडले.

केन्सच्या रोजगार सिध्दांताची वैशिष्टये :

१. केन्सचा रोजगार सिध्दांत सामान्य सिध्दांत आहे - कारणे अ. केन्सने सामान्यपणे आढळून येणारी अपूर्ण रोजगाराची परिस्थिती विचारात घेतली. ब. तेजी व मंदी अश्या दोन्ही परिस्थितीचे स्पष्टीकरण क. समुच्चयात्मक संकल पनांचा विचार केला. ड. मूल्यांचा सामान्य सिध्दांत आणि रोजगाराचा सिध्दांत यांचे एकत्रीकरण केले.
२. पैशाला महत्वपूर्ण स्थान .
३. अल्पकाळ विचारात घेतला आहे.
४. भांडवलशाही अर्थव्यवस्था मान्य केली.
५. सैध्दांतिकतेला अनुभवाश्रित तथ्यांची जोड दिली.
६. खर्चाला महत्वाचे स्थान दिले.
७. गतिशील परिस्थितीचा विचार केला आहे.
८. गुंतवणुकीला महत्वाचे स्थान दिले.
९. संख्यात्मक आणि मानसशास्त्रीय घटकांचा विचार केला.

# केन्सच्या सिध्दांताची गृहीते.

१. अल्पकाळ विचारात घेतला आहे.

२. भांडवलशाही अर्थव्यवस्था

३. पूर्ण स्पर्धा गृहीत मानली आहे.

४. उत्पादनात घटत्या उत्पादन फलाचा नियम कार्यान्वित होतो.

५. बंदिस्त अर्थवव्यवस्था गृहीत मानली.

## केन्सच्या रोजगार सिध्दांताची रुपरेषा :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत जेथे समाजाची एकूण मागणी किंमत व एकूण पुरवठा किंमत यांची समानता होते, तेथे अर्थव्यवस्थेचा समतोल होवून उत्पादन पातळी व रोजगार पातळी निश्चित होते.

**प्रभावी मागणीचे तत्व** : विशिष्ट रोजगार पातळीला ज्या एकूण मागणीचा एकूण पुरवठयाबरोबर समतोल झालेला असतो, त्या एकूण मागणीला प्रभावी मागणी असे म्हणतात.

**प्रभावी मागणी = उपभोग्य वस्तूंवरील खर्च + गुंतवणूक वस्तूंवरील खर्च + सरकारी खर्च**

रोजगाराच्या निरनिराळया पातळयांना होणा-या उत्पादनांच्या विक्रीपासून अपेक्षित उत्पन्न दर्शविणा-या कोष्टकाला एकूण मागणी फलन असे म्हणतात.

**एकूण मागणी कोष्टक**

| रोजगार पातळी(N) (लाख) | एकूण मागणी किंमत(D) (रु. कोटी) |
|---|---|
| २० | २३० |
| २५ | २४० |
| ३० | २५० |
| ३५ | २६० |
| ४० | २७० |
| ४५ | २८० |
| ५० | २९० |

रोजगाराच्या निरनिराळया पातळयांना होणा-या उत्पादनाच्या विकक्रीपासून मिळणारी कमीत-कमी प्राप्ती दर्शविणा-या कोष्टकाला एकूण पुरवठा फलन म्हणतात.


**एकूण पुरवठा कोष्टक**

| रोजगार पातळी(N) (लाख) | एकूण पुरवठा किंमत(Z) (रु. कोटी) |
|---|---|
| २० | २१५ |
| २५ | २३० |
| ३० | २४५ |
| ३५ | २६० |
| ४० | २७५ |
| ४५ | २९० |
| ५० | ३०५ |

# प्रभावी मागणीची निश्चिती :

| रोजगार पातळी(N) (लाख) | एकूण पुरवठा किंमत(Z) (रु. कोटी) | एकूण मागणी किंमत(D) (रु. कोटी) |
|---|---|---|
| २० | २१५ | २३० |
| २५ | २३० | २४० |
| ३० | २४५ | २५० |
| ३५ | २६० | २६० |
| ४० | २७५ | २७० |
| ४५ | २९० | २८० |
| ५० | ३०५ | २९० |

# प्रभावी मागणी निर्धारणाचे आकृतीव्दारे स्पष्टीकरण :



## केन्सच्या रोजगार सिध्दांतावरील टिका :

१.समाजवादी आर्थिक  व्यवस्थेच्या बाबतीत लागू नाही.

२.चलनवाढकारी स्थितीत उपयोगी नाही.

३.दीर्घकालीन समस्यांचा विचार नाही.

४.आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे दुर्लक्ष

५.पूर्ण स्पर्धेचे गृहीत अवास्तव

६.सूक्ष्म आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष

७.अल्पविकसीत देशांना लागू नाही.

## २.३ उपभोग फलन :- अर्थ, उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम,APC, MPC, उपभोगफलनावर परीणाम करणारे घटक :

### उपभोग फलनः

**प्रा. केन्स यांच्या मते, उत्पन्नाच्या निरनिराळया पातळयांवर होणारा उपभोग खर्च दर्शविणारे कोष्टक म्हणजे उपभोग फलन अथवा उपभोग प्रवृत्ती होय.**

$$C= f(Y)$$

C= उपभोग, f= फलनात्मक संबंध , Y = उत्पन्न

### उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम :

उपभोगाचा मानसशास्त्रीय सिध्दांत केन्स यांनी मांडला.

**प्रा. केन्स** यांच्या मते, **मानवी समाजाची अशी प्रवृत्ती असते की, जेंव्हा एकूण वास्तव उत्पन्नात वाढ होते तेंव्हा उपभोग देखील वाढतो .परंतू उपभोगात इतकी वाढ होत नाही जितकी उत्पन्नात होते.**

### उपभोगाच्या मानसशास्त्रीय सिध्दांताची गृहीते :

१. उपभोग खर्चावर प्रभाव पाडणारे मानसशास्त्रीय व संस्थात्मक घटक स्थिर .

२. सामान्य स्थितीचे अस्तित्व.

३.खुल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अस्तित्व

४. उपभोग फक्त हा उत्पन्नावर अवलंबून असतो.

### केन्स यांच्या सिध्दांतावरुन पुढील बाबी स्पष्ट होतात.


१. एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढत असतांना उपभोग खर्चातही वाढ होते. परंतु उत्पन्नाच्या तुलनेत उपभोग खर्चात होणारी वाढ ही कमी असते.

२. उत्पन्नात जेंव्हा वाढ होते तेंव्हा त्याची खर्च अणि बचत यामध्ये विभागणी होते.

३. उत्पन्नात होणा-या वाढीमुळे खर्च आणि बचत या दोन्हींमध्ये वाढ होते.

# उत्पन्नातील वाढीचा उपभोग व बचतीवरील परिणाम :

| उत्पन्न (कोटी रु.) | उपभोग(कोटी रु.) | बचत(कोटी रु.) |
|---|---|---|
| 0 | 10 | -10 |
| 50 | 55 | -5 |
| 100 | 100 | 0 |
| 150 | 145 | 5 |
| 200 | 190 | 10 |
| 250 | 235 | 15 |
| 300 | 280 | 20 |



## केन्सच्या नियमाचे सूचितार्थ :

१.से चा नियम चुकीचा

२.उपभोग फलनाचे महत्व

३.सरकारच्या हस्तक्षेपाची गरज

४.गुंतवणूकीस महत्वाचे स्थान दिले

५. अपूर्ण रोजगार समतोलाचे अस्तित्व

६.घटती भांडवलाची सीमांत कार्यक्षमता

७.व्यापारचक्राच्या वळणबिंदूचे स्पष्टीकरण

| सरासरी उपभोग प्रवृत्ती (Average Propensity to Consume) | सीमांत उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to Consume) |
| --- | --- |
| विशिष्ट काळातील एकूण खर्च-शक्य उत्पन्नाशी असलेले एकूण उपभोग खर्चाचे प्रमाण म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती होय. | उपभोग खर्चातील बदलाचे खर्च-शक्य उत्पन्नातील बदलाशी असलेले प्रमाण म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्ती होय. |
| $APC = \frac{C}{D}$ | $MPC = \frac{\triangle C}{\triangle D}$ |

| उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक | |
|---|---|
| **वस्तुनिष्ठ घटक** | **व्यक्तिनिष्ठ घटक** |
| १. वास्तव व्याजदराचा परिणाम | १. खबरदारीचा उददेश |
| २. खर्च-शक्य उत्पन्न | २. स्वावलंबनाचा उददेश |
| ३.निव्वळ मालमत्तेची खरेदीक्षमता | ३. दूरदृष्टी |
| ४. अपेक्षित भविष्यकालीन उत्पन्न | ४. उपक्रमाचा उददेश |
| ५. उत्पन्नाची वाटणी | ५. सुधारणेचा उददेश |
| ६. राज्यवित्तीय धोरण | ६. कंजूषपणा |
| ७. सामाजिक सुरक्षिततेच्या सुविधा | ७.प्रगतीचा उददेश |
| ८. कर्जाच्या अगर उधारीबाबतच्या अटी | |
| ९.प्रदर्शन प्रभाव | |
| १०. आकस्मिक नफा किंवा तोटा | |